अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com    शुक्रवार दि. २ डिसेंबर २०२२    ▸ वर्ष : २१ वे  ▸ अंक : ६६ वा किंमत : ५ रुपये  ▸ पाने ८


## गुजरातमध्ये पहिल्या टप्प्यासाठी ५६.८८ टक्के मतदान

**गांधीनगर** : गुजरात विधानसभेसाठी पहिल्या टप्प्यातील १९ जिल्ह्यातील ८९ विधानसभा मतदारसंघासाठी ५६.८८ टक्के मतदान झालं. गुजरातच्या एकूण १४,३८२ पोलिंग स्टेशनवर हे मतदान सकाळी ८ वाजल्यापासून सुरू झालं होतं. पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी ७८८ उमेदवार रिंगणात होते, त्यांचं भवितव्य आज मतदान पेटीमध्ये बंद झालं. गुजरातमधील दुसऱ्या टप्प्याचं मतदान आता ५ डिसेंबर रोजी होणार आहे. गेल्या निवडणुकीत याच भागातील ४८ जागांवर भाजपचे उमेदवार निवडून आले होते, तर ४० जागांवर काँग्रेस विजयी झाली होती.



एका जागेवर अपक्षाने बाजी मारली होती. यंदाच्या निवडणुकीत भाजप, काँग्रेससोबत आपचाही समावेश आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. 'आप'चे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार इसुदान गढवी हे खंभलिया मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. पहिल्या टप्प्यातील इतर प्रमुख उमेदवारांमध्ये जामनगर (उत्तर) येथून निवडणूक लढवणारे क्रिकेटपटू रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा आणि सुरतमधील जागांवरून भाजपचे आमदार हर्ष संघवी आणि पूर्णेश मोदी तसेच भावनगरमधून पाच वेळा आमदार राहिलेले पुरषोत्तम सोळंकी यांचा समावेश आहे.

# चिमणीशिवाय कारखाना नाही, होटगीरोडशिवाय विमानतळ नाही

## हट्टवादामुळे चिमणी पडेना, विमान उडेना

**सुराज्य/सोलापूर**

**सोलापूरच्या विकासाचा साक्षीदार असणारा सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना सध्यस्थितीत 'चिमणी'शिवाय चालू शकत नाही. म्हणून कारखाना वाचवण्यासाठी चिमणी वाचली पाहिजे, हा कारखान्यासकट शेतकरी आणि सभासदांचा हट्ट आहे. दुसऱ्या बाजूला बोरामणी विमानतळ चालू होण्यासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे तयार असलेल्या होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. मात्र चिमणी हटल्याशिवाय ते शक्य नसल्यामुळे सोलापूर विकास मंचने चिमणीच्या पाडकामाचा हट्ट धरला आहे. या दोन्ही बाजूच्या 'हट्ट'वादामुळे 'चिमणी' पडेना आणि सोलापुरातून विमान उडेना, अशी अवस्था झाली असून यातून काय तोडगा काढायचा हे प्रशासनाला कळेनासे झाले आहे.**








होटगीरोड विमानतळ विमानसेवेसाठी तयार आहे. मात्र हे छोटे असल्यामुळे बोरामणी परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ काही वर्षांपूर्वी मंजूर केले आहे. आत्तापर्यंत नियोजित बोरामणी विमानतळ नियोजितच राहिले असून अद्याप एक वीटही ठेवण्यात आली नाही.

शेजारच्या गुलबर्ग्यातून विमानसेवा सुरू झाली. काही महिन्यातच विजापुरातूनही विमानसेवा सुरू होत आहे. मात्र पूर्वीपासून विमानतळ असूनही सोलापुरातून विमानसेवा सुरू झालेली नाही.

त्यामुळे होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा तात्काळ सुरू व्हावी, ही विकास मंचची आग्रही मागणी आहे.

### ■ होटगीरोड विमानतळाचाच हट्ट का?

डिसेंबर २००८ मध्ये सोलापूरसाठी बोरामणी परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ मंजूर करण्यात आले. गेल्या १४ वर्षात नियोजित बोरामणी विमानतळाची एक वीटही बसवण्यात आली नाही. आत्ता तात्काळ काम सुरू केले तरी विमानतळाचे बांधकाम पूर्ण व्हायला किमान दहा वर्षे लागतील, असे सांगितले जाते. त्यामुळे ते कधी होईल तेव्हा होईल, तोपर्यंत तयार असलेल्या होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा सुरू करावी, त्यासाठीचे अडथळे तात्काळ दूर करावेत, ही ही सोलापूरकरांची मागणी आहे.

### ■ काय आहे सिध्देश्वर कारखान्याचा हट्ट?

होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्यासाठी कारखान्याची चिमणी अडथळा ठरत आहे. कारखाना आणि वीज निर्मिती प्रकल्प हे एकमेकांवर अवलंबून आहेत. सिध्देश्वर कारखाना आणि कारखान्याचा वीज निर्मिती प्रकल्प या दोन्ही प्रकल्पासाठी कारखान्याने एकच उंच चिमणी उभारली आहे. तीच चिमणी सध्या होटगीरोड विमानतळावरून होणाऱ्या विमान उड्डाणाला अडथळा ठरत आहे. सध्यस्थितीत ही चिमणी पाडली तर कारखाना बंद पडू शकतो. म्हणून चिमणी बचाव, कारखाना बचाव हा हट्ट कारखान्याने धरला आहे.

### ■ विमानसेवेअभावी सोलापूरचे नुकसान

विमानसेवा नसल्यामुळे सोलापूरला नवीन उद्योग येईनासे झाले आहेत. त्यामुळे सोलापूरची औद्योगिक प्रगती थांबली आहे. बोरामणी विमानतळ होईपर्यंत थांबल्यास सोलापूरची प्रगती थांबेल. त्यामुळे होटगीरोडवरून तूर्त विमानसेवा सुरू करणे फायद्याचे ठरणार आहे.

### ■ चिमणी पाडल्यास सभासद, शेतकऱ्यांचे नुकसान

कारखाना स्थळावरून फक्त चिमणी दुसऱ्या जागेवर हलवता येत नाही. चिमणी हलवायची असेल तर कारखाना हलवावा लागेल. इतर ठिकाणावर कारखाना उभारण्यासाठी किमान दोन वर्षे लागू शकतात. त्यामुळे दोन वर्षे कारखाना बंद ठेवल्यास सभासद आणि शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे.

## बाळे येथे पहाटे अपघात; दुचाकीस्वार तरुण ठार

**सोलापूर** : गावातील यात्रेसाठी पुण्याहून दुचाकीवरून निघालेल्या तरुणाचा अनोळखी वाहनाच्या धडकेन अंत झाला. तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला. हा अपघात आज गुरुवारी पहाटेच्या सुमारास पुणे महामार्गावरील बाळे येथे घडला. विजय खाजप्पा निलंगे (वय २० रा.नागणसूर ता.अक्कलकोट) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.

संजीवकुमार बसलिंगप्पा मुंदीनकेरी (वय ३० रा. नागणसूर) हा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. निलंगे आणि मुंदनकेरी हे दोघे नागणसुरचे राहणारे असून ते पुण्यात एका कंपनीत कामाला होते. नागणसूर येथे गावची यात्रा असल्याने दोघेही दुचाकीवरून काल रात्री पुण्याहून निघाले होते.

पहाटे ३ वाजेच्या सुमारास बाळे परिसरातील शिवाजीनगर येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने दोघेही गंभीर जखमी झाले होते. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी निलंगे हा उपचारापूर्वी मरण पावला. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली. हवालदार परीट पुढील तपास करीत आहेत.

## आता प्रशासकीय कामकाज होणार पेपरलेस

### 'ई-ऑफिस' प्रणालीला सुरुवात; मुख्यमंत्र्यांचा निर्णय

**मुंबई** : महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर नव्या निर्णयांचा धडाका सरकारने लावला आहे. आता राज्य सरकारचं प्रशासकीय कामकाज पेपरलेस आणि अधिक गतिमान होणार आहे.

येत्या १ एप्रिल २०२३पासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस' प्रणाली सुरु करण्यात येईल, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केलं आहे. राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस' प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येणार आहे. शिवाय कामकाज संपूर्णपणे पेपरलेस होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. त्यामुळे येत्या १ एप्रिलपासून राज्याच्या सर्व कार्यालयांमध्ये ई-ऑफिस' प्रणाली सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.ई-सेवा निर्देशांकात देखील महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आणण्यासाठी जास्तीत-जास्त सेवांची संख्या वाढविण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. सध्या राज्यातील ४५० सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत. सध्या महाराष्ट्रात फक्त राज्यस्तरावर सुशासन पद्धतीचे पर्यवेक्षण होते, आता शासनाच्या प्रत्येक विभागांचे आणि जिल्ह्यांची गुड गव्हर्नन्स रँकिंग केली जाणार आहे.



शासकीय विभाग आणि जिल्ह्यांच्या प्रशासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शासकीय सेवांची, सुशासनाची क्रमवारी निश्चित करा. या सुशासनाच्या क्रमवारीमुळे विभागांमध्ये आणि जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये स्पर्धा निर्माण होईलच शिवाय जनतेला मिळणाऱ्या सेवांचा दर्जा वाढेल, असंही शिंदे म्हणाले.

## मोदी सरकारने बंद केली अल्पसंख्याकांची शिष्यवृत्ती

**महाराष्ट्रातील १३ लाख विद्यार्थ्यांना फटका; आता फक्त ९ वी, १० वीच्या विद्यार्थ्यांनाच स्कॉलरशीप**

**मुंबई** : इयत्ता पहिली ते आठवी मोफत शिक्षण दिले जाते, असे सांगत मुस्लिम, शिख, पारशी, ख्रिश्चन, जैन आणि बौद्ध या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना केंद्र सरकारकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती मोदी सरकारने अचानक बंद केली आहे.



या योजनेअंतर्गत अल्पसंख्याक विद्यार्थांना शिष्यवृत्ती दिली जात होती. प्रती महिना २२५ रुपये तर वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रती महिना ५२५ रुपये वर्षातून १० महिने दिले जात होते. पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी सर्वसाधारण विद्यार्थ्याला वार्षिक ७५० रुपये तर वसतिगृहातील विद्यार्थ्याला वार्षिक १००० रुपये दिले जात होते. दरम्यान पहिली ते आठवीतील विद्यार्थी हे शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत येत असल्याने त्यांना सरकारकडून आधीपासून मोफत शिक्षण पुरवण्यात येते, असे सांगत मोदी सरकारने ही शिष्यवृत्ती बंद केली आहे. ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांनाच फक्त प्री-मॅट्रिक स्कॉलरशीप देण्यात येईल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले.

सरकारने विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतले पण आता ही शिष्यवृत्तीच बंद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील १३ लाख विद्यार्थ्यांना याचा फटका बसला आहे. यामुळे पुन्हा एकदा मोदी सरकारवर टीका होत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, केंद्र सरकार जर ही शिष्यवृत्ती देत नसेल तर राज्य सरकारने या शिष्यवृत्तीसाठी तरतूद करून शिष्यवृत्ती द्यावी. शिष्यवृत्ती प्रश्नी काँग्रेस पक्ष हिवाळी अधिवेशनात आवाज उठवेल, असे पटोले यांनी सांगितले. मोदी सरकारने मुस्लिम, शिख, पारशी, ख्रिश्चन, जैन आणि बौद्ध या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद केल्याने हिवाळी अधिवेशनात या मुद्द्यावर गदारोळ होण्याची शक्यता आहे.

## चार दिवसांच्या सुट्टीवर आलेल्या इंजियरिंगच्या मुलीची घरात गळफास घेऊन आत्महत्या

**सुराज्य/बार्शी**

**कोरफळे येथील मुलगी बाहेरगावच्या इजीनियरिंग कॉलेजमध्ये शिकत असलेली सारिका रामचंद्र दगडे (वय १९) चार दिवस सुट्टी असल्याने गावी आली असता तिने घरातच साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.**



ही घटना २७ रोजी कोरफळे ता.बार्शी येथे स्वयंपाक घरात ही घटना झाल्याने याबाबत तिचे वडील रामचंद्र बाळासाहेब दगडे (वय ४५ रा.कोरफळे) यांनी तालुका पोलीसात खबर देताच आत्महत्येचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसानी दिलेल्या माहितीनुसार, ही मुलगी पंढरपूर येथील गोपाळपूर इंजिनियरिंग महाविद्यालयात तिसऱ्या वर्षात शिकत असून चार दिवस सुट्टी असल्याने ती २५ रोजी गावी आली होती. तिचे वडील या गावच्या येमाई देवीचे पुजारी असल्यांने ते आज २७ रोजी सकाळी मंदिरात मुलाला घेऊन पूजेसाठी गेले होते तर तिची आई मुलगी सारिका या दोघीच घरी होत्या.

आईने सकाळी १० वा. भांडी घासून घेऊन घरात आली असता मुलीने गळफास घेतल्याचे पाहून तिने पतीला तातडीने फोनवरून घरी बोलावून सारीकाने गळफास घेतल्याचे सांगितले. याबाबततालुका पोलिसांना कळविले. आत्महत्येचे कारण आद्यपही समजले नसून पुढील तपास पोलीस नाईक प्रदीप केसरे करत आहेत.

## एमपीएससी निवड झालेल्या १११ उमेदवारांना नियुक्ती देण्यास उच्च न्यायालयाची स्थगिती

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) निवड झालेल्या १११ उमेदवारांना नियुक्ती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या उमेदवारांना यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात येणार होते. पण, त्यापूर्वी उच्च न्यायालयाने आदेश दिल्याने उमेदवारांतून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

यानंतर मराठा क्रांती मोर्चाचे नेते आक्रमक झाले आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २०१९ साली परिक्षा घेण्यात आली होती. त्यातील उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नियुक्ती पत्र दिले जाणार होते. त्याआधाची १११ उमेदवारांच्या नियुक्तीला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. सर्वसाधारण प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना इब्लूएस प्रवर्गातून नियुक्ती देण्यास उच्च न्यायालयाने स्थगिती दिली.

याबाबत बोलताना मराठा नेते विनोद पाटील म्हणाले, १०४३ उमेदवारांपैकी १११ जणांना सोडून नियुक्ती देण्यास हरकत नाही, असे न्यायालयाने सांगितलं.

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे



हो..हो..! तातडीचे उपचार आहेत ते!

**कल्याण**
**300-38-170**

**मेन बाजार**
**239-41-560**

## ग्रामपंचायत निवडणुकीचे अर्ज ऑफलाईन स्विकारण्यास परवानगी

### शेवटच्या दिवशी अडीच तासांची मुदतवाढ; सरपंचपदासाठी ४५५ तर सदस्यासाठी २३०७ अर्ज दाखल

**सुराज्य/सोलापूर**

ग्रामपंचायत निवडणूक साठी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सर्व्हर डाऊन झाल्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. तक्रारी वाढल्यानंतर शासनाच्या वतीने ऑफलाईन अर्ज स्विकारण्याच्या सूचना केल्या त्यानुसार सोलापूर जिल्ह्यात ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात आले आहे.

आज शुक्रवारचा शेवटचा असल्याने अडीच तास वाढवून देत साडेपाच वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार असल्याची माहिती निवडणूक शाखेचे विठ्ठल उदमले यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायत च्या निवडणुकीसाठी गुरूवारी १ डिसेंबर रोजी सरपंचपदासाठी २४७ तर सदस्यसाठी १४४४ अर्ज दाखल झाले आहेत. ऑनलाईनचे सर्व्हर डाऊन झाल्यामुळे उमेदवारांना अर्ज दाखल करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. तक्रारी वाढल्यापासून गुरुवार पासून ऑफलाईन अर्ज दाखल परवानगी देण्यात आली अर्ज दाखल करण्यासाठी चौथ्या दिवशी सरपंच पदासाठी २४७ तर सदस्यासाठी १४४ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी दिली. तर आता पर्यंत सरपंच पदासाठी ४५५ तर सदस्यासाठी २००७ अर्ज दाखल झाले दरम्यान शुक्रवार दि. २ डिसेंबर रोजी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. सर्व्हर डाऊन मुळे वेळ वाया गेल्याने तीन नंतर अडीच तास म्हणजे ५.३० पर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. शहर उत्तर व शहर दक्षिण कार्यालयात भरण्यास गर्दी वाढत आहे.






**तालुकानिहाय दाखल अर्ज**

| गाव | सरपंच | उपसरपंच |
|---|---|---|
| करमाळा | ५४ | २३७ |
| माढा | १६ | १६० |
| बार्शी | ३७ | १४१ |
| उत्तर सोलापूर | २५ | १६४ |
| मोहोळ | ३६ | १४६ |
| पंढरपुर | ३७ | १७४ |
| माळशिरस | ८२ | ४६३ |
| सांगोला | २१ | ८४ |
| मंगळवेढा | ५४ | ३०० |
| दक्षिण सोलापूर | ६० | २८६ |
| अक्कलकोट | ३३ | १५२ |
| एकूण | ४५५ | २३०७ |